महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
अधिदान व लेखा कार्यालय

☎ ०२२ - २६५६६३३६
E-mail : pao@mahakosh.in

लेखा कोष भवन, ए विंग
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

क्र.अले/नियंत्रण/व्यवस्थापन/वाहन निर्लेखन/ जा. क्र. २१५ (1)

दि. 19 JUN 2023

निर्लेखित केलेल्या वाहनाची लिलावाने विक्री सूचना

अधिदान व लेखा कार्यालयातील निर्लेखित केलेल्या वाहनाची लिलावाद्वारे विक्री करावयाची आहे. ज्या संस्थांना / व्यक्तींना सदर निर्लेखित वाहन खरेदी करावयाचे आहे. त्यांना सदर वाहन दिनांक २१.०६.२०२३ ते ३०.०६.२०२३ या कालावधीत कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी ११.०० ते सायंकाळी ४.०० या वेळेत पाहता येईल.

लिलाव विक्रीची सुचना, अटी व शर्ती www.mahakosh.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर तसेच कार्यालयाच्या वांद्रे व चर्चगेट येथील सुचना फलकावर लावण्यात आल्या आहेत. ज्यांना लिलावाच्या अटी व शर्ती मंजुर असतील अशा संस्था / व्यक्तींनी लिलावात सहभागी व्हावे. लिलावासाठी पाठवावयाचे आपले दर बंद पाकिटातून कार्यालयाच्या उपरोक्त पत्त्यावर दिनांक ३०.०६.२०२३ पर्यंत पाठवावे. सदर बंद लिफाफे दिनांक ०३.०७.२०२३ रोजी सकाळी ११.३० वाजता अधिदान व लेखा अधिकारी यांच्या दालनात उघडण्यात येतील. ज्या व्यक्तीचे/ संस्थांचे दर जास्त असतील अशा संस्थेस/व्यक्तीस वाहनाची विक्री करण्यात येईल.

(विलास गांगुर्डे)
अधिदान व लेखा अधिकारी

सहपत्र : लिलावाच्या अटी व शर्ती.

वाहन लिलाव सुचना याच्या अटी व शर्ती

१. सदर वाहन अधिदान व लेखा कार्यालय, लेखा व कोष भवन, ए विंग, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे पूर्व, मुंबई ४०००५१ येथे ठेवण्यात आले आहे. त्यानुसार दिनांक २१.०६.२०२३ ते ३०.०६.२०२३ या कालावधीत दररोज सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत वाहनाची प्रत्यक्ष पाहणी करून जास्तीत जास्त दर नमूद करावेत. वाहनाची सद्यस्थिती पाहिल्याशिवाय लिलावात भाग घेऊ नये अन्यथा नंतर कोणतीही तक्रार अथवा सबब स्विकारली जाणार नाही.

२. लिलावाद्वारे सदर दरपत्रके अधिदान व लेखा कार्यालय, लेखा कोष भवन वांद्रे (पूर्व), मुंबई, स्वीकारण्याचा कालावधी दिनांक २१.०६.२०२३ ते दिनांक ३०.०६.२०२३ सकाळी ११.०० ते सकाळी ४.०० असा राहील.

३. लिलाव प्रक्रियेत भाग घेणारी संस्था मुंबई महानगर विकास प्राधिकरण (MMRDA) परिक्षेत्रातील असणे आवश्यक आहे. MMRDA परिक्षेत्राबाहेरील संस्थेने वाहन लिलाव प्रक्रियेत भाग घेतल्यास त्यांचे दरपत्रक स्विकृत केले जाणार नाही.

४. लिलावाने विक्री करावयाचे वाहन जेथे आहे व ज्या अवस्थेमध्ये आहे त्या अवस्थेमध्ये ताब्यात घ्यावे लागेल. वाहनाच्या अवस्थेमध्ये कोणताही बदल अधिदान व लेखा कार्यालयाकडून केला जाणार नाही.

५. ज्या संस्थेची लिलाव बोली इतर संस्थांपेक्षा जास्त असेल अशाच संस्थेस वाहनाची रोखीने (रु. २००० च्या नोटा स्विकारल्या जाणार नाहीत.) एकाच वेळी (One time payment full and final settlement करणे सक्तीचे आहे) ज्या संस्थेस वाहन विक्री करण्याचे ठरविले आहे. त्या संस्थेने वाहन ताब्यात घेण्यापर्वी वाहनाची संपुर्ण रक्कम या कार्यालयात जमा करणे अनिवार्य आहे.

६. विक्री केलेले वाहन कार्यालयाच्या आवारातून नेणेचे कार्यवाही दरम्यान संपुर्ण व सर्व प्रकारचा खर्च ठेकेदारास स्वखर्चाने करावा लागेल. त्याबाबत कोणताही खर्च कार्यालयाकडून केला जाणार नाही.

७. ठेका मंजुर केलेल्या संस्थेने वाहन उचलण्याचे काम कार्यालयीन वेळेत म्हणजे सकाळी ११.०० ते सायंकाळी ४.०० पर्यंत साप्ताहिक / सार्वजनिक सुट्या वगळून कामकाजाच्या दिवशी करावयाचे आहे.

८. लिलावाने विक्री केलेले वाहन कंत्राटदाराने ताब्यात घेतल्यानंतर कार्यालयाच्या आवाराबाहेर नेताना कार्यालयाच्या इमारतीचे / आवारातील कोणत्याही साहित्याचे कोणतेही नुकसान झाल्यास त्याची भरपाई ठेकेदाराकडून त्याच ठिकाणी (on the spot) रोखीच्या स्वरुपात वसुल करण्यात येईल व याबाबत ठेकेदारास बाजू मांडण्याची कोणतीही संधी दिली जाणार नाही.

९. लिलाव बोली कोणतेही कारण न देता स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचा तसेच लिलावाची कार्यवाही कोणत्याही ठप्प्यावर थांबविण्याचा अथवा त्यामध्ये कोणताही फेरबदल / सुचना करण्याचा संपुर्ण अधिकार अधिदान व लेखा अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. तसेच याबाबत कोणतीही कारणीमिमांसा केली जाणार नाही.

१०. ज्या संस्थेची / व्यक्तीची लिलाव विक्रीची उच्चतम बोली स्विकारण्यात येईल त्या संस्थेने / व्यक्तीने अधिदान व लेखा कार्यालयाकडे लिलावाच्या रकमेचा रोखीने भरणा केल्यानंतर पुढील ७२ तासांच्या आत विक्री केलेले वाहन स्वखर्चाने अधिदान व लेखा कार्यालयाच्या आवारातुन उचलून नेणे आवश्यक आहे.

११. वाहन लिलावाकरीता दरत्रक सादर करावयाचा अंतिम दिनांक ३०.०६.२०२३ (सायंकाळी ४.००)असा आहे.

*** अधिदान व लेखा कार्यालयाचे जुने व निर्लेखित झालेले वाहन याचा लिलाव विक्रीबाबत लिलाव सुचनेमध्ये नमूद केलेल्या वरील सर्व अटी / शर्ती मला पुर्णपणे मान्य आहेत. तसेच सदर अटी आणि शर्तींबाबत माझी कोणतीही तक्रार किंवा हरकत असणार नाही.**

नाव ..... स्वाक्षरी व संस्थेचा रबरी शिक्का .....

ठिकाण :-

दिनांक :-